**नियमित दिवाणी दावा क्र.८७/२०२५ मधील निशाणी क्र.५ वरील आदेश.**
**(अजिनाथ काळे विरुध्द दत्तात्रय काळे व इतर)**

MHAH140001382025

प्रस्तुत अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे आदेश ३९ नियम १ अन्वये दाव्याचा अंतिम निकाल लागेपावेतो प्रतिवादी क्र.१ ने दावा मिळकत कोणत्याही प्रकारे हस्तांतर करु नये असा तूर्तातूर्त मनाई हुकूम मिळण्यासाठी दाखल केला आहे. प्रस्तुत अर्जासोबत वादीने शपथपत्र दाखल केले आहे.

२. **दावा व अर्ज निशाणी ५ मधील वादीचे थोडक्यात कथन खालील प्रमाणेः-**
मौजे लोहगाव, तालुका नेवासा, जिल्हा अहमदनगर येथील गट क्र.३७१/२ क्षेत्र १ हे. ५९ आर ही मिळकत हा दाव्याचा विषय आहे. प्रतिवादी क्र. १ हे वादीचे वडील, प्रतिवादी क्र.२ वादीची आई व प्रतिवादी क्र.३ ते ५ हे वादीचे सख्खे भाऊ आहेत. दावा मिळकत ही त्यांची एकत्र हिंदू कुटुंबाची मिळकत आहे. वादीचे आजोबा व प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांची मौजे कारेगाव येथील वडिलोपार्जित शेतजमिन विक्री करुन त्या पैशातून दावा मिळकत घेतलेली आहे. दावा मिळकतीमध्ये वादी व प्रतिवादी यांची सामाईक कब्जे वहिवाट आहे. प्रतिवादी क्र.१ यांना सन १९९९ ते २००० च्या दरम्यान वेड्याचे झटके येवू लागले. त्यावर त्यांनी उपचार घेतले. त्यानंतर वादीचे आजोबा यांनी गट क्र. ३७१/२ पैकी मधले क्षेत्र ७९ आर ही मिळकत व प्रतिवादी क्र.१ यांनी पूर्वेकडील ८० आर व पश्चिमेकडील ७९ आर असे १ हे. ५९ आर ही मिळकत तोंडी वाटपाने आपसात वाटून घेतली.

३. परंतु, प्रतिवादी क्र.१ यांना मागील एक महिन्यापासून पुन्हा वेड्याचे झटके येवू

लागले आहेत. त्या गोष्टीचा गैरफायदा घेवून गावातील व परिसरातील लोक दावा मिळकत लुबाडण्याच्या प्रयत्नात आहेत. दि.२०.०१.२०२५ रोजी वादी व प्रतिवादी हे कामधंद्यासाठी शेतात गेले असता मौजे लोहगाव येथील आसाराम सखाराम वाघ याने प्रतिवादी क्र.१ यास दुय्यम निबंधक नेवासा येथील कार्यालयात नेवून दावा मिळकत त्याच्या जवळच्या नातेवाईकाच्या नावे करण्याचा प्रयत्न केला. वादी व प्रतिवादी क्र.२ ते ५ यांना याबद्दल समजल्यानंतर ते दुय्यम निबंधक कार्यालयात गेले असता त्यांना पाहून आसाराम सखाराम वाघ व त्याचे नातेवाईक पळून गेले. त्यामुळे प्रतिवादी क्र.१ हा दावा मिळकत हस्तांतर करु नये याकरीता प्रस्तुत दावा दाखल केला आहे. परंतु, दरम्यानच्या काळात प्रतिवादी क्र.१ याने दावा मिळकत कोणत्याही प्रकारे हस्तांतर करु नये याकरीता तुर्तातूर्त मनाई हुकुम मिळावा म्हणून वादीने प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे.

४. प्रतिवादी क्र.१ यास दाव्याचे समन्स प्राप्त होवून देखील तो दाव्यात हजर न राहिल्याने त्याच्याविरुध्द एकतर्फा आदेश पारित केलेला आहे. प्रतिवादी क्र.२ ते ५ यांनी निशाणी ११ वर प्रस्तुत दावा मान्य असल्याची पुरसिस दाखल केली आहे.

५. वादीतर्फे विधिज्ञ ॲड. श्री.बी.आर.भुसारी यांचा युक्तीवाद ऐकला. सर्व दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले.

६. अर्जाच्या निर्गतीच्या दृष्टीने माझे विचारात उपस्थित झाले. त्यांचे सकारण निष्कर्ष खालीलप्रमाणे नोंदवित आहे–

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| १. | वादी सकृतदर्शनी सदरचा दावा त्यांच्या लाभात आहे असे असे सिध्द करतात काय ? | होय |
| २. | वादी न्यायाचा समतोल त्यांच्या बाजुने आहे असे सिध्द करतात काय ? | होय |
| ३. | तुर्तातुर्त मनाई आदेश नाकारल्यास वादींचे अपरिमित नुकसान होईल काय ? | होय |
| ४. | आदेश काय? | अर्ज मंजूर करण्यात येतो. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ ते ३ करीता –**

७. तूर्तातूर्त मनाई हुकुम मिळणेकरीता वादीने दावा सकृतदर्शनी त्याच्या लाभात आहे, न्यायाचा समतोल त्याच्या बाजूने आहे व तूर्तातूर्त मनाई हुकुम न दिल्यास त्याचे अपरिमित नुकसान होईल या तिन्ही बाबी सिध्द करणे आवश्यक आहे.

८. वादीच्या कथनानुसार दावा मिळकत ही त्याची व प्रतिवादी यांची एकत्र कुटुंबाची मिळकत आहे. त्यामध्ये सर्वांचा हिस्सा आहे. तसेच दावा मिळकत वादी व प्रतिवादी यांच्या सामाईक कब्जे वहिवाटीत आहे. वादीने निशाणी ३ सोबत दावा मिळकतीचा ७/१२ उतारा दाखल केला आहे. त्यावरुन दावा मिळकत ही प्रतिवादी क्र. १ याच्या नावे असल्याचे दिसून येते. परंतु, वादीच्या कथनानुसार दावा मिळकत ही वाटपाने प्रतिवादी क्र.१ च्या नावे आलेली आहे. वादी व प्रतिवादी हे एकाच कुटुंबातील व्यक्ती आहेत. प्रतिवादी क्र. १ ने दाव्यात हजर राहून आपली कैफियत दिलेली नाही. त्यामुळे वादीने केलेले कथन व दाखल कागदपत्रे

यावरुन दावा मिळकत ही त्यांच्या एकत्र कुटुंबाची असल्याचे दिसून येते. त्यामुळे वादी व प्रतिवादी या दोघांचा दावा मिळकतीमध्ये हिस्सा आहे. यावरुन प्रस्तुत दावा सकृतदर्शनी वादीच्या लाभात असल्याचे सिध्द होते.

९. वादीने कथन केलेले आहे की, प्रतिवादी क्र.१ यास वेड्याचे झटके येतात, त्याच्यावर मानसोपचार केंद्रामध्ये उपचार झाले होते. आज देखील प्रतिवादी यास वेड्याचे झटके येतात. त्या गोष्टीचा गैरफायदा घेवून काही लोक दावा मिळकत त्यांच्या नावे करण्याकरीता प्रयत्नात आहेत. त्याकरीता वादीने दि.२०.०१.२०२५ रोजी इसम नामे आसाराम सखाराम वाघ याने दावा मिळकत त्याच्या नातेवाईकांच्या नावे हस्तांतर करुन घेण्याचा प्रयत्न केल्याची बाब दाव्यात नमूद केलेली आहे. वादीने प्रतिवादी क्र. १ याच्या उपचाराचे कागदपत्र दाखल केलेले आहे. त्यावरुन प्रतिवादी क्र.१ याने सन २००१, २००३ यामध्ये मानसोपचार घेतल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. वर नमूद केल्याप्रमाणे दावा मिळकत ही वादी व प्रतिवादी यांच्या एकत्र कुटुंबाची व सामाईक कब्जे वहिवाटीची आहे. अशा परिस्थितीत प्रतिवादी क्र.१ याने दावा मिळकत त्रयस्थ इसमास हस्तातर केल्यास वादीच्या हक्कावर बाधा येईल. याउलट प्रतिवादी क्र.१ याच्या विरुध्द हस्तांतर करण्यास तूर्तातूर्त मनाई आदेश पारित केल्यास प्रतिवादी क्र.१ याचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्यामुळे न्यायाचा समतोल वादीच्या बाजूने आहे.

१०. सबब, सकृतदर्शनी दावा मिळकतीमध्ये वादी व प्रतिवादी दोघांचे हक्क असून प्रस्तुत दावा प्रलंबित असताना प्रतिवादी क्र.१ याने दावा मिळकत हस्तांतर केल्यास वादीच्या

हक्कावर बाधा येवून त्याचे नुकसान होवू शकते. म्हणून दाव्याचा अंतिम निकाल लागेपावेतो प्रतिवादी क्र.१ विरुध्द दावा मिळकत कोणत्याही प्रकारे हस्तांतर करु नये असा तूर्तातूर्त मनाई आदेश पारित करणे योग्य व उचित ठरेल. सबब, मुद्दा क्र. १ ते ३ चे उत्तर होकारार्थी नोंदवित असून मुद्दा क्र.४ करीता खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. वादीचा निशाणी ५ वरील अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. १ याने दावा मिळकत ही दाव्याचा अंतिम निकाल लागेपावेतो कोणत्याही प्रकारे हस्तांतर करु नये असा तूर्तातूर्त मनाई आदेश पारित करण्यात येतो.

३. खर्चाबाबत अंतिम निकालावेळी आदेश पारित केला जाईल.

SANDHYA YUVRAJ SUL
Digitally signed by SANDHYA YUVRAJ SUL
Date: 2025.03.27 16:59:03 +0530

(**संध्या यु. सुळ**)

दिनांक–२७/०३/२०२५

२ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
नेवासा, जि. अहमदनगर